महिलांचा शैक्षणिक दर्जा व श्रमशक्तीतील सहभागाचे आर्थिक विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

SYNOPSIS

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर

संशोधक,

बबिता गणपतराव हेबारे

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक,

प्रा.डॉ.पी.पी. लोणारकर

सहाय्यक प्राध्यापक,

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जानेवारी २०१८

महिलांचा शैक्षणिक दर्जा व श्रमशक्तीतील सहभागाचे आर्थिक विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

प्रस्तावना:

२० वे शतक हे भारतीय स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनातील होणाऱ्या फार मोठया क्रांतीचा साक्षीदार आहे. कारण २० व्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत भारतातील स्त्री ही बऱ्याच गोष्टीसाठी उपेक्षीली गेलेली होती तसेच तिला स्वत:च्या घरी ही दुय्यम पध्दतीची वागणुक मिळायची याला समाजातील रुढी, परंपरा, स्त्री ही फक्त उपभोगाचे साधन आहे. असा दृष्टीकोन कारणीभूत होतो तसे काही प्रमाणात स्त्रिया स्वत: ही यास जबाबदार होत्या. कारण प्राचीन काळाचे जर आपण निरिक्षण केले तर आपल्याला असे दिसून येईल की, जेव्हा मनुष्य हे तंबुतील भटके जीवन जगत होते तेव्हा पासून तर १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत यामध्ये समाजाची निर्मिती होण्यापासुन तो स्थिर होऊन कुंटूब पध्दती अस्तित्वात येई पर्यंतच्या फार मोठया काळात सुध्दा स्त्री ही प्रत्येक कार्यात पूरुषाची समान वाटेकरी होती, परंतू ‘चुल आणि मुल’ यांच्या व घरकामाच्या जबाबदारीने ती पिचुन गेली होती, तसेच ती घराबाहेरील इतर कार्यासाठी फक्त पुरुषच कसे योग्य आहेत व स्त्री हे कार्य करण्यास समर्थ नाही असा जो विचार समाजात रुजविला गेला यामुळे भारतीय स्त्री स्वत: ला चार भिंतीच्या आत सुरक्षित समजू लागली आणि घराबाहेरील कार्यक्षेत्रातील तिच्या भूमिकेला तिनेच मुठमाती दिली. याला काही अंशी स्त्री स्वत: आणि काही प्रमाणात भारतीय पुरुष प्रधान संस्कृती, रुढी, परंपरा, कुटूंबाची जबाबदारी त्यांचे समाजात असणारे दुय्यम स्थान, शिक्षणाचा अभाव इत्यादी गोष्टी कारणीभूत आहेत. त्यामुळे भारतीय स्त्रीचा औद्योगिक क्षेत्रातील व घराबाहेरील कार्यक्षेत्रात तिचा वाटा हा अत्यल्प होता.

आधुनिक व खुल्या अर्थव्यवस्थेच्या युगात औद्योगिक क्षेत्रात अनेक स्त्रिया उद्योजक व कामगार म्हणून महत्वाची भुमिका बजावत आहेत. एखादया उद्योगाची स्थापना करून त्याचे संचलन करणारी व त्यास यशस्वी करण्यासाठी विविध कार्याची जबाबदारी पार पाडणारी स्त्री म्हणजे स्त्री उद्योजक होय व अशा पध्दतीच्या उद्योग किंवा व्यवसायात नोकरी करुन आपली उपजिवीका करणाऱ्या स्त्रियांना स्त्री कामगार असे संबोधले जाते. मात्र तरीही भारतासह इतर अनेक देशात स्त्रीयांच्या श्रमशक्तीतील सहभागाला साातत्याने दुय्यम स्थान दिले जात आहे. स्त्रियांनी दैनंदिन कौटुंबिक कार्यात जे योगदान दिले आहे. याचे आर्थिक मापन देखील केले जात नाही. मात्र २१ व्या शतकाच्या सुरवातीस स्त्री शिक्षणाच्या वाढत्या

प्रमाणामुळे व औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन प्रक्रियेत व सेवाक्षेत्रात स्त्री—कामगाराचा सहभाग अत्यंत वेगाने वाढलेला दिसतो. भारताच्या तुलनेत युरोपियन राष्ट्रे, अमेरीका, जपान, कोरीया, कॅनडा या पुढारलेल्या (देशातील) व प्रगत राष्ट्रातील महिला हया सर्वच क्षेत्रात मोठया संख्येने कार्य करीत आहेत. तेथील अर्थव्यवस्था, सामाजिक परिस्थिती, पुरुषांच्या बरोबरीने समान दर्जा व वागणुक शिक्षणाची समान संधी आदी अनेक घटक त्यास कारणीभूत आहेत. भारतीय स्त्रियांचो श्रम शक्तीतील सहभाग जवळपास पुरुषांच्या बरोबरीने आहे. अधिकतर स्त्रिया हया कौटुंबिक कार्यासाठी आपले श्रम खर्चीत केल्यामुळे त्यांना आर्थिक मुल्य दिले जात नाही. म्हणून स्त्रियांच्या श्रम शक्ती बाबत अभ्यास करणे गरजेचे आहे. श्रम हया शब्दाच्या व्याख्या आणि अर्थ पुढील प्रमाणे सांगितलेल्या आहेत.

व्याख्या आणि अर्थ :

1. OXFORD DICTIONARY:

" The People engaged in or available for work either in a country or area in particuler firm or industry."

" एखाद्या देशात किंवा क्षेत्रात अथवा त्यामधिल एका विशिष्ट संस्थेत किंवा कारखाण्यात काम करणारे अथवा कामासाठी उपलब्ध असणाऱ्या लोकांचा समुह. "

2. WIKIPEDIA :

" The work Force or labour Force is the labour pool in employment it is generally used for to decribe those peoples working for a single company but can also apply to a geographical region like a city state or country."

''श्रमशक्ती किंवा श्रमिकशक्ती म्हणजे रोजगार असलेल्या अशा लोकांचा समुह जे सामान्यत: एकाच उद्योग वा कारखान्यातील लोकांचे वर्णन करते परंतु ते एका प्रदेशातील, राज्यातील व देशातील भौगोलिक क्षेत्रालाही लागु पडते.''

3. CAMBRIGE DICTIONARY :

"The Group of people who work in country industry company etc."

''एखादया कारखाना, व्यवसायवा देश इत्यादी मधील कार्य करणाऱ्या लोकांचा समुह.''

4. COLLINS DICTIONARY :

"The work Force is the total number of people in a country or a region who are physically able to do a job and o available for work."

Or "The work Force is the total number of people who employed by a particular Company."

''एखाद्या देशातील अथवा प्रदेशातील शारीरिकदृष्टया श्रम करण्यास उपयुक्त व एखादे श्रम करण्यास उपलब्ध असलेला विशिष्ट लोकांचा समुह म्हणजे श्रमशक्ती होय.'' किंवा ''एका विशिष्ट उद्योगिक मंडळाकडून रोजगार उपलब्ध झालेल्या लोकांचा समुह म्हणजे श्रमशक्ती होय.''

5. Census of India :

The Total number of workers employed by a company on a specific Job, Project etc

''किसी विशेष नोकरी, परियोजना आदि पर एक कंपनीव्दारा नियोजित श्रमिकों की कुल संख्या.''

6. MERRIAN WEBSTER DICTIONARY :

"The worker engaged a specific activity or enterprise."

''एका विशिष्ट कामात किंवा उपक्रमात गुंतलेले श्रमिक म्हणजे श्रमशक्ती होय.''

श्रमाचा अर्थ:

कोणत्याही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मोबदल्याच्या अपेक्षेने केल्या जाणारे शारीरिक अथवा बौध्दिक कष्ट म्हणजे श्रम होय. शेतकरी, सुतार, गवंडी इत्यादी हे शारीरिक कष्ट करतात व हया सर्वाचे कष्ट मोबदल्यासाठीच असतात व ते श्रम या व्याख्येत मोडतात. परंतु एखाद्याने मोबदला न घेता कष्ट अथवा कार्य केल्यास ते श्रमाच्या व्याख्येत मोडत नाहीत. उदा. गायकाने एखादे गाणे रियाझ म्हणून अथवा स्वत:च्या समाधानासाठी गायल्यास ते श्रम होऊ शकणार नाही. परंतु तेच गाणे जर मानधनासाठी एखाद्या कार्यक्रमात गायल्यास ते श्रमामध्ये मोडते.

उत्पादन प्रक्रियेमध्ये श्रम हा एक अनिवार्य घटक आहे. नैसर्गिक साधन सामुग्री, कच्चामाल, असे सर्व उपलब्ध असून ही त्याच्यावरील उत्पादन प्रक्रिया करणारा श्रम हा घटक नसेल तर उत्पादन होत नाही. श्रमाचा वाढता वापर श्रमाची गुणवत्ता व अधिक श्रमातुन साधले जाणारे कौशल्य अथवा

कार्यक्षमता या बाबी आजपर्यंतच्या मानवी प्रगतीस कारणीभूत ठरल्या आहेत, परंपरेने **भूमी, श्रम, भांडवल व संयोजक** हे चार घटक उत्पादनाचे मुलभूत घटक मानले गेले असून त्यातही श्रम या मानवी घटकास तुलनेने अधिक महत्व आहे. **कार्ल मार्क्स** यांनी आपल्या समाजवादी विचारप्रणालीत श्रम हा एकच उत्पादन घटक मानला आहे व श्रमातून उत्पादन साधल्या जाते असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. आधुनिक समाजव्यवस्थेत यंत्रे, स्वयंचलीकरण, संगणकीकरण यांचा मोठया प्रमाणावर वापर होत असला तरी या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष विनीयोग, त्याचे उपयोजन त्यांची निर्मिती देखभाल यासाठी श्रमाची गरज अढळपणे आहे.

भारताला विकासाच्या दृष्टीने चालना देण्यासाठी भारतात स्त्रियांचा कामातील सहभाग वाढवण्याचा तज्ञ सल्ला देत आहेत. स्त्री पुरुष भेदभाव हा घटक स्त्रियांच्या या स्थितीला कारणीभूत आहे. कामाच्या ठिकाणी स्त्री पुरुष प्रमाणाचा तोल ढळला आहे. तसेच कमी वेतनाच्या उद्योगामध्ये स्त्रियांच्या नोकऱ्या दिसुन येत आहेत. उदा. उत्पादन क्षेत्रात तंबाखु उत्पादन, तयार कपडे, कापड गिरण्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण प्रथम पासुन जास्त आहे, तसेच शिक्षण, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता इत्यादिमध्ये स्त्रिया जास्त प्रमाणात दिसतात. खर तर स्त्रियांचा कामामधिल सहभाग हा समाजाच्या मानसिकतेवर अवलंबुन असतो. हे भारताबाबतीत अगदी स्पष्ट आहे. मुळात स्त्रीने घराबाहेर पडून काम का करायचे ? असा मुलभूत प्रश्न आजही विचारला जातो. काम करुन पैसा कमविणे संपत्ती निर्माण करणे तीचे व्यवस्थापन करणे हे सर्व स्त्रीला समृध्द करते. आज जागतिक पातळीवर महिलांचा कामामधिल सहभाग वाढत असताना भारतात ते कमी होताना दिसत आहे. भारतात महिलाश्रमशक्ती सहभागाचा(Female Labour Force Participation (FLFP) दर हा ३१.१० टक्के एवढा आहे. पण वाढ होण्याऐवजी तो भारतात कमी झाला आहे.

स्त्रियांचे आर्थिक सहभाग व संधीच्या **ग्लोबल जेंडर रिपोर्ट २०१५** च्या निर्देशंकात १४४ देशात भारताचा १३६ क्रमांक होता. यामध्ये चीन ६३.९० टक्के, अमेरिका ७९.९० टक्के, नेपाळ ५४.४० टक्के, बांग्लादेश ३५.१ टक्के, श्रीलंका ३५ टक्के, युरोपिय राष्ट्रे ५०.८० हे देश वर होते, तर पाकिस्तान २४.६० टक्के, अरब २३.३० टक्के हे देश भारताच्या खाली होते, तसेच एकूण जागतिक महिलांचा कामगार सहभाग दर पहायचा असल्यास तो दोन दशके जवळपास स्थिर होता, असे लक्षात येईल. १९९२ ला जागतिक महिला श्रमिक सहभाग दर हा ५२.२० टक्के तर २०१२ ला तो ५१.४० टक्के एवढा होता, म्हणजे दोन दशकात जागतिक पातळीवर महिला श्रमिक सहभाग

दरामध्ये ०.०८ टक्के ऐवढी घसरण झाली होती. गेल्या काही वर्षापासुन सातत्याने भारतीय महिलांचा कामामधिल सहभाग कमी होत चालला आहे. याला बरीच कारणे आहेत. भारतातील रुढी व परंपरा आहेत. जर घरात आर्थिक परिस्थिती चांगली असेल तर भारतात घराबाहेर स्त्रियांना कामास परवानगी नाकारल्या जाते तर कधी कधी त्या काम करण्याऐवजी फक्त शिक्षणच घेत असतात. स्त्रीने गरज असली तरच नोकरी करावी. अन्यथा घर सांभाळावे अशी मानसिकता समाजामध्ये आहे. कारण स्त्रिला थोडच घर चालवायच आहे. घर तर पुरुष चालवतो असे आतापर्यंत समाजाचा व स्त्रियांचा ही दृष्टिकोन आहे म्हणजे स्वविकासासाठी स्त्रीने काम करावे ही आणखी ही सहजपणे स्वीकारल्या जात नाही. यामध्ये काही अनिष्ठ मान्यतेमुळे समाजातील महिलांचा श्रमशक्तीतील सहभाग कमी असल्याचे दिसुन येते.

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून २०१२—२०१३ या वर्षामध्ये भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जि.डि.पी.) ५.६ टक्के होता तर सन २०१५—२०१६ या आर्थिक वर्षांमध्ये त्यात २ टक्केने वाढ होऊन भारताचा जि.डि.पी. ७.६ टक्के एवढा झाला. याच वेळेस भारतीय अर्थव्यवस्थेतील २००४—२००५ एकूण रोजगार हे ४५७.९० दक्षलक्ष होते ज्यामध्ये पुरुष श्रमिक सहभाग दर ८४ टक्के तर स्त्री श्रमिक सहभाग दर हा ४२.७० टक्के होता. तर २०११—२०१२ या आर्थिक वर्षात ४७२.९० टक्के एकूण रोजगार तर त्यामध्ये पुरुष व महिला श्रमिक सहभाग दर अनुक्रमे ७९.८० टक्के व ३१.२० टक्के होते. म्हणजे पुरुषांचा श्रमिक सहभाग दरामध्ये ०.४० टक्के स्त्री श्रमिक सहभाग दरात ११.४० टक्के एवढी मोठी घट झाली. २००४—२००५ या वर्षात बेरोजगार पुरुषांची संख्या २.१० टक्के एवढी होती. तर बेरोजगार महिलांची संख्या २.६० टक्के एवढी होती. तर २०१३—२०१४ या वर्षात बेरोजगाराची पुरुषांची संख्या २.९० टक्के एवढी झाली व बेरोजगार स्त्रियांची संख्या ४.९० टक्के एवढी झाली. म्हणजे पुरुष बेराजगारांची संख्या ०.८० टक्केने वाढली तर त्याच जागी महिला बेरोजगाराची संख्या २.३० टक्केने म्हणजे दुपटीपेक्षा जास्त वाढली.

महिलांचे शिक्षण :

‘ स्त्री साक्षर तर संपूर्ण कुटूंब साक्षर ’ असे महात्मा गांधीनी म्हटलेले आहे, देशाच्या विकासाचा विचार केला तर देशाच्या प्रगतीचे साधन म्हणजे तेथील स्त्रियांचे समाजातील स्थान लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणुन सामाजिक व आर्थिक बदलामध्ये स्त्रीची भूमिका महत्वाची ठरत असते. भारतीय संस्कृतीचा विचार केला असता स्त्री पुरुष हे कुटूंबातील महत्वाची भूमिका बजावत असतात. म्हणून पुरुषाबरोबर

स्त्रियांना कुटूंबात महत्वाचे स्थान आहे. स्त्रिया हया काम करुन अर्थार्जनात सहाय्यक भूमिका निभवत असतात.

औपचारिकशिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण :

औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाच्या सापेक्ष मुल्यावर झालेला वाद अनेक वर्षांपासुन अस्तित्वात आहे. एखाद्या शाळेत किंवा विद्यापीठात परंपरेने औपचारिक शिक्षण होते आणि अनौपचारिक शिक्षणापेक्षा ते अधिक मोठे मूल्य असते. जसे कामाच्या ठिकाणी शिकणे.

शिक्षणासाठी सामाजिक, सांस्कृतिक स्विकृत आदर्श म्हणून औपचारिक शिक्षणासाठी ही संकल्पना प्रथम १९७३ मध्ये **स्किबर्नर आणि कोल** यांनी आव्हान केली होते. ज्याने दावा केला होता की आयुष्यात सर्वात जास्त गोष्टी अनौपचारिक प्रक्रियेव्दारा चांगल्या प्रकारे शिकतात. उदाहरणार्थ भाषेतील शिक्षण उदाहरण म्हणुन. शिवाय मानववंशशास्त्रज्ञांनी असेही सांगितले की स्थानिक शिक्षणात अदयापही वैचारिक शिक्षण घेण्यात आले नाही, ज्यामध्ये एकही शैक्षणिक संस्था नव्हती.

दररोजच्या जीवनात असे घडते जे या ज्ञानाचा किंवा शिक्षणाचा पुरेपुर वापर होत नाही किंवा पुर्णपणे समृध्द होत नाही. यामुळे ओईसीडीच्या शिक्षण मं्त्र्यांनी १९९६ मध्ये सर्वांमध्ये जीवनभर शिकवण्याचे धोरण घोषित केले. यामध्ये पाच खंडातील २३ देशांचा समावेश आहे. याने औपचारिक आवेदनशील आणि अनौपचारिक हे युरोपीयन युनियनशी जोडलेले आहे. याने जीवनभराच्या शिक्षणासाठी धोरणे विकसित केली आहे. जी विशेषत: कामाच्या ठिकाणी औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाची ओळख पटवून देण्यासाठी त्याचे मूल्यमापन करण्यासाठी आणि प्रमाणित करण्यासाठी आवश्यकतेवर केंद्रित आहे.

औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचे महत्व :

विकासात शिक्षण महत्वपुर्ण भुमिका बजावत असते. औपचारिकशिक्षणाच्या प्रवेशाच्या पलीकडे असणाऱ्या मोठया लोकसंख्याच्या लोकांना जुळून घेण्याच्या शैक्षणिक संधी व नविन कौशल्य, ज्ञान प्रदान करण्यासाठी शालेय कार्यक्रमापेक्षा महत्त्वाचे आहे.

१९६०च्या कालखंडाच्या उत्तरार्धात आणि १९७० च्या सुमारास अनौपचारिक शिक्षणाला लोकपसंती प्राप्त होऊ लागली आज अनौपचारिक शिक्षण वारंवार आणि आजीवन शिकण्याची एक संकल्पना म्हणून पाहिली जाते.

खाजगी महिलांमध्ये अनौपचारिक शिक्षण लोकप्रिय आहे. कारण यामुळे खाजगी व सार्वजनिक दोन्ही क्रिया कलापानमध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे. साक्षरता कार्यक्रम स्त्रियांच्या आत्मसंमानावर नाटयमय परिणाम करतात. कारण ते आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकिय क्षेत्रात त्यांच्या क्षमतेला मुक्त करतात.

युनेस्को २०१० नुसार अनौपचारिक शिक्षण शिक्षणाच्या समान प्रवेशासाठी महिलांतील निरक्षरता नष्ट करण्यासाठी आणि व्यावसायिक प्रशिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि निरंतर शिक्षण यापर्यंत महिलांना प्रवेश सुधारण्यास मदत करते. गैर भेदभावपुर्ण शिक्षण आणि प्रशिक्षण विकासाला प्रोत्साहन देखील देते. अशा साक्षरता आणि अनौपचारिकशिक्षणिक कार्यक्रमाची परिणाम कारकता कौटुंबिक समाज व पालकांच्या सहभागावर आधारले जाते.

समाजाच्या योग्य वाटचालीसाठी व स्त्रियांच्या समृध्द जीवनासाठी स्त्री शिक्षण हे फार महत्वाचे आहे, कारण ज्या देशातील स्त्रिया हया शिक्षित आहेत. त्या देशाचे आर्थिक, सामाजीक व सांस्कृतीक जीवन हे उन्नत झालेले आहे. त्यामुळे महिलांचे जीवन हे फक्त त्यांच्या कुंटूबासाठीच नव्हे तर देशाच्या प्रगतीसाठी किती गरजेचे आहे हे लक्षात येते.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०६ कोटी आहे, ज्यामधून ६२.३१ कोटी पुरुष तर ५८.७५ कोटी स्त्रीया होत्या. भारतातील २०१६ या वर्षी मानवी संसाधन विकास मंत्रालयाने शिक्षणावर केलेल्या सर्व्हेक्षणानुसार प्राथमिक स्तरावरील शालेय शिक्षणातील मुलीची संख्या ९५५५६, माध्यमिक शालेय मुलीची संख्या १८१८० तर उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलीची संख्या ११०६१ एवढी होती मध्ये त्यात २१ टक्के वाढ होऊन उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलीची संख्या १५.३ दशलक्ष एवढी झाली यामधून १२.४ दशलक्ष मुली हया पदवीचे शिक्षण घेत आहे. त्यामधून ३८.०० टक्के कलाशाखेत, ११.०० टक्के विज्ञान शाखेत, १२.०० व्यापार शाखेत, ४.५ तंत्रज्ञान शाखेत, ४.० टक्के अभियांत्रिकी शाखेत १५ टक्के हया इतर शाखेत शिक्षण घेत आहे. तसेच याच वर्षी १.९ दशलक्ष मुली हया पदव्योत्तर शिक्षण पुर्ण करीत आहे ज्यामध्ये ५.४ टक्केकला शाखेत, १.४ व्यवसाय शाखेत, २.३ टक्के शिक्षण शाखेत, ०.५ टक्के कायदा शाखेत, ०.८ टक्के संगणक शाखेत, ०.४ टक्के तंत्रज्ञान शाखेत, ०.५ वैद्यकीय शाखेत तर ०.२ टक्के अभियांत्रिकी शाखेत शिक्षण पूर्ण करीत आहेत आणि या सर्वातील मिळून ४० टक्के मुली हया पी.एचडी चे संशोधन कार्य करीत असतात.

यावरुन आपल्याला असे लक्षात येईल की, भारतामध्ये उच्चशिक्षणातील मुलीचे प्रमाण हे वाढत आहे. परंतु त्यानुसार महिलांचे रोजगार वाढतांना दिसत नाही. २०१५ मधील आय एम एफ ने केलेल्या अभ्यासात असे लक्षात आले की, १९९१ मधील महिला कामगाराचे प्रमाण हे ३५ टक्के होते हे २०१४–१५ मध्ये शिक्षणाच्या तुलनेने वाढ व्हायला हवे होते परंतु दुर्दैवाने ते २०१४–१५ मध्ये २७ टक्के एवढे झाले आहे म्हणजे भारताच्या बाबतीत मुलीचे शिक्षण आणि त्याचा कामातील सहभाग यात विरुध्द संबंध निदर्शनास येते.

भारतातील महिला कामगाराच्या बाबतीतील कायदे:

१. भारतातील राज्यघटनेत १४ व्दारे समानतेचा हक्क कलम १५ दृारे भेदभावापासून संरक्षण हक्क व कलम २१ दृारे जगण्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क मुलभूत अधिकार म्हणून बहाल केला आहे.
२. **द इक्वल रिम्यूनरेशन एक्ट** १९७६ अर्थातच या कायद्यानुसार कोणत्याही क्षेत्रात नोकरी देतांना स्त्री–पुरूष असा भेद होणार नाही, जर स्त्री–पुरूष दोघेही एकच काम करत असतील तर त्यांना त्या कामाचा समान मोबदला मिळावा हे कायद्यात स्पष्ट केले आहे.
३. भारतीय संविधानाच्या आर्टिकल ३९ नुसार प्रत्येक नागरीकाला मग तो स्त्री असो किंवा पुरूष समान कामाचा मोबदला हा समान मिळालाच पाहिजे.
४. महाराष्ट्र शासनाने १९९३ साली राज्य महिला आयोगाची स्थापना करुन दुर्बल स्त्रियांच्या गरजावंर लक्ष केंद्रीत केले आहे.

तसेच द फेयर वेज कमिटी १९४८ नुसार ही स्त्री असो पुरूष दोघांना समान कामाचा समान मोबदला मिळावा असे निर्देशित केलेले आहे. परंतु भारतात आजही महिला कामगारांना दुय्यम स्थान दिले जाते. कमी पैशात हवे तेवढे काम करून घेतले जाते शिवाय कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांना कामावरून काढुन टाकल्या जाते. वर्ल्ड इकोनॉमिकने १५ ते ६४ वर्षे वयोगटातील महिला कामगाराच्या सर्व्हेशनात असे नमुद केले आहे की, भारतातील ज्या महिला कामगार काम करतात त्यातील ६६ टक्के कामाचा मोबदला त्यांना मिळत नाही, तसेच भारत स्त्री–पुरूष समानता निर्देशंकात १०८ व्या स्थानावर फेकला गेला आहे. भारताची या क्रमवारीत २१ अंकानी घसरणे झाली आहे. तसेच महिलांना कर्तृत्व सिध्द करण्याच्या मिळणाऱ्या संधीमध्ये भारत १३९ व्या तर महिलाच्या आरोग्य आणि सोयी सुविधामध्ये १४१ व्या स्थानावर आहे.

शहरी असो वा ग्रामिण दोन्ही ठिकाणी महिला कामगारांना पुरूषाच्या तुलनेत जो मोबदला किंवा मजुरी मिळते ती निम्म्यापेक्षाही कमी मिळते आणि हे संघटीत क्षेत्रात व असंघटीत क्षेत्रात दोन्ही ठिकाणी पहायला मिळते. भारतात हे प्रमाण फार मोठे आहे. ब्रीक्समध्ये सामिल असणाऱ्या चार देशांपैकी भारत हा सगळयात खालच्या स्थानावर आहे.

ग्लोबल जेंडर गॅपच्या २०१० च्या रिपोर्टनुसार महिला व पुरूष यांच्या पगारातील तफावत २०१० मध्ये ५७ टक्के होती तर २०१७ मध्ये ती ६७ टक्के वर गेली आहे इतरत्र कामाच्या ठिकाणी ते ३५ टक्के आहे तर ग्रामीण भागात शेती सारख्या ठिकाणी ते ६० टक्के एवढा आहे म्हणजे पुरूषांना त्याच मजुरीचे तितक्याच तासासाठी ६० टक्के जास्त मजुरी मिळते. २१ व्या शतकात प्रवेश करतांनाचे हे एक प्रखर वास्तव आहे आणि ते भारतच नाही तर जगभरातील विकसित देशही यावर उपाययोजना शोधण्याचे कार्य करित आहेत.

संशोधन साहित्याचा आढावा :

संशोधनाच्या कार्यात लेखक साहित्यिक अभ्यासक व संशोधक यांनी केलेल्या अध्ययनाचा वापर भविष्यात संबंधित घटकाला व्हावा हा हेतु बाळगून साहित्याची निर्मिती झालेली असते. त्याचाच भाग म्हणून प्रस्तुत शोध प्रबंधात विषयोच्या संदर्भात आढावा घेण्यात आला आहे.

१. विजेंद्र काबरा (२००१): यांनी सन १९७१–१९८१ या कालखंडात मराठवाडा श्रमशक्तीची तुलना महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्राशी करून मराठवाडयातील श्रमशक्तीत होणाऱ्या वाढीची कारण मिमांसा याचा अभ्यास केला. त्यात महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडयामध्ये भूमीहिन आणि अल्पभूधारकांचा वर्ग मोठया प्रमाणात दिसून आला आहे. याचे कारण वाढती लोकसंख्या आणि दारिद्रय आहे. मराठवाडयाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये स्त्री शेतमजुरांचे प्रमाण अधिक आहे. सन १९७१–१९८१ या कालखंडात स्त्री पुरूष शेतमजुरांच्या संख्येत वाढझाली आहे. या वर्गाला मिळणारा अनियमीत रोजगार व बेकारी हे दारिद्रयाचे मुख्य कारण आहे. असे निदर्शनास आले आहे.

२. मुकादम पाटील २००१ : यांनी स्त्री श्रमशक्तीचे देशाच्या आर्थिक विकासात महत्त्व, स्त्री पुरूषांच्या रोजगाराचे स्वरूप याचा अभ्यास केला यांच्यामते शेती व्यवसायात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना मिळणारा रोजगार कमी आहे. मराठवाडयात शेती व्यवसायात अतिरिक्त लोकसंख्या आहे. या लोकसंख्येला इतर व्यवसायात वळविणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागात शेतमाल प्रक्रीया उद्योग, घरगुती उद्योग,

लघु कुटीरोद्योग यावर विशेष भर देण्यात यावा. काही उद्योग स्त्रियांसाठी राखीव ठेवावेत. व्यवसायिक शिक्षण सर्व समावेशक करण्याचा प्रयत्न करावा असा अभ्यासाअंती निष्कर्ष काढला आहे.

३. नीता आनंद २००३: यानी विविध व्यवसायातील स्त्रियांच्या सहभाग दरात झालेल्या बदलाचा अभ्यास केला यांच्यामते सन १९७१–२००० या कालखंडात सार्वजनिक खाजगी क्षेत्रात विविध व्यवसायात शिक्षणामुळे स्त्रियांचा सहभाग दर वाढला आहे. इतर सर्व व्यवसायापेक्षा शेती व्यवसायात स्त्री मजुरांचा सहभाग दर सर्वाधिक आहे याबाबत अभ्यास केला आहे.

४. करूणा कुलकर्णी २००४ : यांनी ग्रमीण महिलांच्या आर्थिक सक्षमिकरणासाठी शिक्षणाचे महत्व याचा अभ्यास केला त्यांच्या मते, ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी शेतीवर आधारलेले लघु उद्योग सुरु करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात घरगुती अनेक व्यवसाय सामुदायिकरीत्या सुरु करता येतात. शेतमालावर आधारलेल्या अन्नधान्यावरील प्रक्रिया उद्योग जर ग्रामीण भागात विकसित केल्यास अनेक महिलांना रोजगार मिळून ते आर्थिक–दृष्टया सक्षम होतील याबाबत अभ्यास करण्यात आला आहे.

५ शांती चक्रवर्ती (१९७५) : यांनी स्त्री मजुरांचा शेती व पुरक व्यवसायातील सहभाग दर शेत व कुटूंबातील कामाचे तास आणि वेतनाचा अभ्यास केला त्यांच्या मते, स्त्री शेत मजुर ही कुटूंबात आणि शेतीत काम करुन दुहेरी भूमिका पूर्ण करत आहे. शेती बरोबरच शेतीशी पुरक व्यवसायात सहभाग दर जास्त आहे. कुटूंबात चार तास व शेतीत आठ तास ती काम करते. स्त्री पुरुष वेतन दरात भिन्नता आहे. शेतीत स्त्रीयांचा पर्याप्त उपयोग करुन घेण्यासाठी त्यांची कार्यक्षमता आणि कुशलता वाढविणे, आधुनिक व्यवसायांचे प्रशिक्षण प्रात्याक्षिकाव्दारे देणे, योग्य व्यवस्थापन आणि निडबेस योजनांची गरज आहे.

६ लिलागुलाटी (१९७६) : यांनी सन १९६४ ते १९६५ दरम्यान ग्रामिण चौकशीचा अभ्यास केला आहे. त्यांच्यामते भारतातील ग्रामीण भागात स्त्री शेत मजुरांच्या बेकारीचा प्रश्न अधिक आहे. आर्थार्जनात स्त्री शेत मजुरांचा सहभाग दुय्यम आहे. पुरुष शेत मजुरांच्या तुलनेत स्त्री शेत मजुरांना मिळणारा रोजगार म्हणजे कामाचे दिवस कमी आहेत. अंतरराज्य स्त्री पुरुष शेतमजुरांच्या बेकारीत तफावत आहे. शेती व्यवसायावर काम करणाऱ्या स्त्री पुरुष शेतमजुरांच्या बेकारीचे निर्मुलन करण्यासाठी कोणतीच अशी विशेष योजना नाही. यामुळे यावर्गाच्या बेकारीचा प्रश्न उग्र स्वरुपाचा आहे. याबाबत अभ्यास केला आहे.

७ एस बी माळी (२०११) : यांनी मराठवाडयातील महिलांच्या विकासात स्वयंसहाय्यता गटाची भूमिका या विषयी अभ्यास करीत असतांना स्वयंसहाय्यता गटांची स्थापना करणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये ग्रामिण महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक ठरेल. गट पदाधिकारी यांनी गटाची जबाबदारी योग्यरित्या सांभाळण्यासाठी कायदेशिर नियमावली असावी अशा विविध आवश्यक घटकावर त्यांनी अभ्यास केला आहे.

८. **शिवानी लक्ष्मण गायकवाड (२०१२) :** महिला उद्योजकता विकासात स्वयंसहायता बचत गटाची भूमिके बाबत अध्ययन करण्यात आले त्यांनी शासनाने पुरुष प्रधान समाज व्यवस्था नष्ट करावी, शासनाने महिलांचा सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी प्राप्त करुन द्याव्यात. शासनाने महिला विकासाच्या संदर्भात भारतीय राज्य घटनेमध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व कलमांची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी. महिलांबाबत धोरण चांगल्या प्रकारे राबवावे अशा विविध पैलुवर त्यांनी अभ्यास केला आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनात महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राहणीमान याबाबत समस्या सुत्रण करण्यात येईल. संशोधन कार्यपार पाडण्यासाठी नांदेड जिल्हयातील महिलांचे प्रत्यक्ष भेटी घेण्यात येतील व त्यांच्या श्रमसहभागाचे निरिक्षण करण्यात येईल. गृहितकांच्या माहितीच्या आधारे पडताळणी करण्यात येईल व संशोधनाच्या उद्देशाची पडताळणी करण्यात येईल. नांदेड जिल्हयातील महिलांचे श्रमसहभागाचे अध्ययन करण्यासाठी संशोधन आराखडयानुसार त्यांची मांडणी करण्यात येईल. प्रस्तावित संशोधन कार्यासाठी तथ्य संकलन करण्यासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातुन प्राथमिक तथ्य संकलन व ग्रंथ, पुस्तके, मासिके यांच्या माध्यमातून दुय्यम तथ्य संकलन संकलीत करण्यात येईल. संशोधन कार्य करताना समस्या सुत्रण,निरीक्षण,वर्गीकरण,गृहितके पडताळणी, संशोधन आराखडा, तथ्यांचे विश्लेषण व निष्कर्ष, तथ्याचे निर्वाचन पूर्वकथन करुन प्रस्तुत शोध प्रबंधाचे संशोधन कार्य पार पाडण्यात येईल.

संशोधनाची गरज :

भारताची जनगणना २०११ नुसार नांदेड जिल्हयाची एकूण लोकसंख्या ही ३३,६१,२९२ एवढी असून त्यात स्त्रियांची संख्या ही १४,१२,२६५ एवढी आहे. स्त्रियांची शैक्षणिक स्थिती, सामाजिक स्थिती, आर्थिक स्थितीचे अवलोकन करणे हे गरजेचे आहे. स्त्रियांचे बऱ्याच समस्या आहेत, जे की, आर्थिक प्रगतीला

बाधा ठरत आहेत अशा समस्याचे निराकरण करुन त्यांची प्रगती करणे काळाची गरज आहे, याअनुषंगाने नांदेड जिल्हयातील महिलांचा शैक्षणिक दर्जा व श्रमशक्तीतील सहभागाचे आर्थिक विश्लेषण करणे आवश्यक आहे.

संशोधनाचे महत्व:

नांदेड जिल्हयातील स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा आणि त्यांचे श्रमशक्तीमधील सहभाग या प्रस्तुत संशोधन कार्याचे महत्व हे स्त्री ही समाजाचा एक मुख्य घटक आहे, ती समाजाची जननी आहे. तिच्या श्रम सहभागाने देशाच्या दरडोई उत्पन्नात निश्चितच वाढ होते, त्यामुळे स्त्री श्रमिकांचा रोजगार, उत्पन्न, शिक्षण, दरडोई उत्पन्न, कर्ज, सहभाग दर, कामाचे स्वरुप, आर्थिक व सामाजिक स्थिती, वेतनदर व राहणीमान यात झालेला बदल यांचा एकत्रित अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासनास, जनतेस, विविध संस्थेस व शासनास धोरण ठरविण्यासाठी ही संपुर्ण माहिती उपयोगी पडेल. यासाठी प्रस्तुत विषयाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

संशोधनाचेउद्देश:

मराठवाडयातील नांदेड जिल्हयातील महिलांचा शैक्षणिक दर्जा व श्रमशक्तीतील सहभागाचे आर्थिक विश्लेषण हा शोध प्रबंध पूर्ण करताना खालील उद्दिष्टे पुढे ठेवून संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल.

१. नांदेड जिल्हयातील महिलांच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. नांदेड जिल्हयातील महिलांच्या शैक्षणिक सुधारणेमुळे होणाऱ्या आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.
३. नांदेड जिल्हयातील ग्रामिण व शहरी महिलांचा श्रमसहभागाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४. नांदेड जिल्हयातील महिलांच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास करणे.
५. नांदेड जिल्हयाच्या विकासात महिलांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

ग्रहितके :

नांदेड जिल्हयातीलमहिलांचा शैक्षणिक दर्जा व श्रमशक्तीतील सहभागाचे आर्थिक विश्लेषण या प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये गृहितकांच्या आधारे निवडलेल्या विषयासंबधीच्या समस्यांचे निराकरण करणे, संशोधनाची दिशा निश्चित करणे आणि योग्य सामग्राची निवड करणे या सर्वच क्रिया पार पाडण्यात येतील.यासाठी पुढील ग्रहितके घेण्यात आलेली आहे.

१. **महिलांची शैक्षणिक स्थिती आणि आर्थिक स्थिती यामध्ये जवळचा संबंध आहे.**

२. **स्त्रियांचा श्रमशक्तीतील सहभाग हा पुरुषांपेक्षा कमी आहे.**

३. **ग्रामिण व शहरी भागातील महिलांच्या श्रमशक्तीतील सहभागामध्ये तफावत आहे.**

तथ्य संकलन पध्दती:

सामाजिक समस्याची उकल करणे व समाजाला ज्ञान व त्यांची गरज भागविणे हा मुख्य हेतू संशोधनाचा असतो त्यामध्ये विविध घटकावर अध्ययन करण्यात येऊन समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येत असतो. म्हणुन प्रस्तुत शोध प्रबंधात पुढील तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

अ. प्राथमिक तथ्य संकलन पध्दती :

प्राथमिक तथ्य संकलनामध्ये प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली व मुलाखती हया तथ्य संकलनाच्या साधनांचा वापर केला जाईल. ज्यामध्ये प्रामुख्याने नमुना म्हणुन निवड केलेल्या स्त्रियांच्या वय, शैक्षणिक दर्जा, आर्थिक स्थिती तसेच सामाजिक संदर्भातील आणि एकूणच श्रम शक्तीतील सहभागा संदर्भातील माहिती गोळा केली जाईल.

ब. व्दितीय तथ्य संकलन पध्दती :

प्रस्तुत संशोधनामध्ये नांदेड जिल्हयाची निवड केली असल्याकारणाने या जिल्हयाविषयीची माहिती देण्यासाठी दुय्यमस्तोत्राचा वापर केला जाईल. त्याचप्रमाणे संशोधनासाठी आवश्यक असणारे तथ्य मांडण्यासाठी किंवा तथ्य संकलीत करण्यासाठी तसेच पुरक माहिती गोळा करण्यासाठी प्रकाशीत ग्रंथे, अप्रकाशीत माहिती, शोधनिबंध, शासकिय अहवाल, वर्तमान पत्रे, शोधप्रबंध, इत्यादीचा वापर केला जाईल.

अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे नांदेड जिल्हयापुरते मर्यादीत आहे. नांदेड जिल्हयातील महिलां या संशोधनाच्या व्याप्तीत येतील.

संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे नमुन्यावर आधारित आहे. त्याच प्रमाणे प्रस्तुत संशोधन हा केंद्र बिंदु असून निरीक्षर स्त्रियांच्या–बाबत लाजाळूपणा व गोपनियता सारख्या वृत्तीमुळे माहिती संकलनावर मर्यादा पडु शकतात. तसेच दुय्यम स्वरुपाच्या माहितीसाठी विविध स्त्रोत वापरल्यामुळे उपलब्ध झालेल्या तथ्यांची तंतोतंत पडताळणी प्रत्यक्ष स्त्रोताशी होऊ शकणार नाही. प्रस्तुत संशोधनाचे हे निष्कर्ष नांदेड जिल्हयापूरते मर्यादित असतील.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयातील एकूण १६ तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्रत्येक तालुक्यातुन १०० महिलांची नमुना म्हणुन निवड करण्यात येईल. निवडलेल्या नमुन्याची विभागणी करतांना ५० टक्के हया महिला तालुक्याच्या ठिकाणाहुन आणि ५० टक्के हया महिला ग्रामिण भागातुन (खेडयातुन) निवडल्या जातील. अशा प्रकारे प्रस्तुत संशोधन हे एकूण १६०० ऐवढया नमुना आकाराच्या तथ्यावर आधारीत असणार आहे. प्रस्तुत संशोधनाचा केंद्रबिंदु हे महिला हा असल्या कारणाने संशोधनासाठीचे विश्व हे फार मोठे आहे. म्हणुन वेळ,पैसा आणि उपयुक्तता लक्षात घेवून प्रस्तुत संधोधनासाठी नमुन्याचा आकार १६०० ऐवढा ठरविण्यात आलेला आहे.

तथ्य विश्लेषण :

नांदेड जिल्हयातील महिलांचा शैक्षणिक दर्जा व श्रमशक्तीतील सहभागाच्या समस्यांची उत्तरे शोधून काढण्यासाठी गोळा केलेली माहिती योग्यपध्दती तकत्यांच्या स्वरुपात मांडली जाईल. त्यांची पुनर पडताळणी केली जाईल आणि टक्क्केवारी,सरासरी,सहसंबंध इत्यादी सारखी सांख्यिकिय साधने वापरली जाईल व मिळालेल्या माहितीचे सादरीकरण विविध आलेखांचा वापर करुन सुस्पष्ट स्वरुपात मांडली जाईल.

प्रकरणाची आखणी :

१. प्रस्तावना

२. संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पध्दती

३. नांदेड जिल्हया एक दृष्टिक्षेप

४. महिलांची सामाजिक व शैक्षणिक स्थिती

५. महिलांची आर्थिक स्थिती व श्रमशक्तीतील योगदान

६. निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सुची :

१. प्रा.डॉ.सुधीर बोधनकर,प्रा. विवेक अलोणी, ॲड. मृणाल कुलकर्णी सामाजिक संशोधन पध्दती, जानेवारी २००७ श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर

२. डॉ.पी.एल. भांडारकर, सामाजिक संशोधन २००७, विद्या बुक्स, औरंगाबाद

३. विजेंद्र काबरा, २००१ मराठवाडयातील ग्रामीण रोजगार व मनुष्यबळ नियोजन मराठवाडा खंड दोन पान क्र ४—८९

४. मुकादम पाटील २००१,स्त्री रोजगार व रोजगार संधी मराठवाडा खंड भाग २ पृष्ठ क्र ४— १९७

५. Dr.Neeta Anand 2003, Working Women: Issue & Problems

६. www.census.in

७. www.nanded.nic

८. www.wikipedia.com

संशोधक,

बबिता गणपतराव हेबारे

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

संशोधन मार्गदर्शक,

प्रा.डॉ.पी.पी.लोणारकर

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड